# महाराष्ट्र शासन
## पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी क्र.: ०२२-२२६२३४४६/३३८० ई-मेल आयडी : mahaarchaeology@gmail.com


क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.-चित्रीकरण/ 86 दिनांक - 14 JAN 2021

**प्रति,**

**उप-सचिव**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**महाराष्ट्र शासन**
**मंत्रालय, मुंबई - ३२**

**विषय - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्य संरक्षित स्मारक परिसरात चित्रीकरण हेतु संचालनालयाकडून देण्यात येणाऱ्या परवानगीचा कालावधी निश्चित करण्याबाबत व याबाबत अधिसुचना प्रसिद्ध करण्याबाबत**

**संदर्भ - १. संचालनालयाचे पत्र क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.- चित्रीकरण/ १४५३, दि. २७ नोव्हेंबर, २०२०**
**२. संचालनालयाचे पत्र क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.- चित्रीकरण/ १५२७, दि. ११ डिसेंबर, २०२०**
**३. संचालनालयाचे पत्र क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.- चित्रीकरण/ १६२७, दि. २८ डिसेंबर, २०२०**
**४. संचालनालयाचे पत्र क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.- चित्रीकरण/०९, दि. ०४ जानेवारी, २०२१**
**५. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. रासंस्मा-२०२०/प्र.क्र.१११/सां.का.३, दि. ०६ जानेवारी, २०२१**

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून कळविण्यात येते की महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष नियम, १९६२ भाग ७, नियम ३९,४०,४१,४२ व ४४ अन्वये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्य संरक्षित स्मारक परिसरात चित्रीकरण हेतु संचालनालयाकडून देण्यात येणाऱ्या परवानगीचा कालावधी निश्चित करण्याबाबत व याकरिता सेवाविषयक अधिसुचना राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत संचालनालयातर्फे संदर्भ क्र. ४ अन्वये मार्गदर्शन मिळणेबाबत शासनास विनंती करण्यात आली होती. संदर्भ क्र. ५ अन्वये संचालनालयस्तरावरून पुरविण्यात येणारी सदरहु सेवा शासनस्तरावरून अधिसुचित करण्याचा विहित कालावधी संपुष्टात आल्याने याबाबतची कार्यवाही संचालनालयस्तरावरून करण्याचे व राज्य संरक्षित स्मारक परिसरात चित्रीकरणासाठी निर्णय घेण्याचा कालावधी ६ दिवस असा विहित करण्यास हरकत नसल्याचे संचालनालयास कळविण्यात आले आहे.

या अनुषंगाने याबाबत प्राप्त अधिसुचना प्रारूप संचालनालयस्तरावरून प्रसिद्ध करण्यात येत आहे व याबाबत शासकीय मुद्रणालयास कळविण्यात आले आहे (प्रत **अनुबंध - १** मध्ये संलग्न आहे).

माहितीस्तव सादर.

**संलग्न -**
वरीलप्रमाणे


(डॉ. तेजस म. गर्गे)
संचालक


**प्रत माहितीकरिता -**
१. **श्री. शंतनु सिंह, सिनियर प्रोजेक्ट कंसल्टंट, मुंबई**

अनुबंध – 1


# महाराष्ट्र शासन
## पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय
सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार
छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई - ४०० ००१
दुरध्वनी क्र.: ०२२-२२६२३४४६/३३८०
ई-मेल आयडी : mahaarchaeology@gmail.com


क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.-चित्रीकरण/ 87

दिनांक - 14 JAN 2021

**प्रति,**

**व्यवस्थापक**
**शासकीय मुद्रणालय**
**नेताजी सुभाषचंद्र मार्ग**
**चर्नी रोड, मुंबई - ४**

**विषय - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्य संरक्षित स्मारक परिसरात चित्रीकरण हेतु संचालनालयाकडून देण्यात येणारी सेवा अधिसुचित करण्याबाबत**

**संदर्भ - १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र. रासंस्मा-२०२०/प्र.क्र.१११/सां.का.३, दि. ०६ जानेवारी, २०२१**

उपरोक्त संदर्भीय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, महाराष्ट्र प्राचीन स्मारके व पुराणवस्तुशास्त्रविषयक स्थळे व अवशेष नियम, १९६२ भाग ७, नियम ३९,४०,४१,४२ व ४४ अन्वये राज्य संरक्षित स्मारक परिसरात चित्रीकरण हेतु संचालनालयाकडून सेवा पात्र व्यक्तींना पुरवली जाते. सदर सेवा महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत अधिसुचित करण्याहेतु संचालनालयस्तरावरून कार्यवाही करण्याकरिता संचालनालयास संदर्भ क्र. १ अन्वये सुचित करण्यात आले आहे (प्रत **अनुबंध - १** मध्ये संलग्न आहे).

या अनुषंगाने सदरहु अधिसुचनेचा मसुदा मराठी व इंग्रजी भाषेत पत्रासमवेत संलग्न आहे. कृपया सदर अधिसुचना राजपत्रात प्रसिद्ध करण्याची कार्यवाही करण्यात यावी व अधिसुचनेच्या ३० प्रती सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व ३० प्रती संचालनालयास कृपया सादर करण्यात याव्यात.

**संलग्न -**
वरीलप्रमाणे

(डॉ. तेजस म. गर्गे)
संचालक

महाराष्ट्र शासन

पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय

सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई - ४०० ००१

दुरध्वनी क्र.: ०२२-२२६२३४४६/३३८० ई-मेल आयडी : mahaarchaeology@gmail.com


क्र. तंत्र २०२०-२१/मं.प.-चित्रीकरण अधिसुचना/ ९२ दिनांक - 14 JAN 2021

**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**

**पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय**

सेंट जॉर्ज किल्ला, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ, मुंबई - ४०० ००१

## अधिसूचना

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५**

क्रमांक संकीर्ण २०१४/प्र. क्र. २१६/ आस्थापना - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५) च्या कलम ३ मधील पोट-कलम (१) अन्वये प्राप्त अधिकारानुसार पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग याव्दारे उक्त अध्यादेशाच्या प्रयोजनार्थ पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या अधिपत्याखालील पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय आणि त्यांच्या अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयांमार्फत पात्र व्यक्तींना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवाकरिता नियत कालमर्यादा, पद निर्देशित अधिकारी, प्रथम आणि व्दितीय प्राधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

## परिशिष्ट

### १. संचालक, पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई

| अ.क्र. | लोकसेवेचा तपशिल | लोकसेवा पुरविण्यासाठी विहित केलेली कालमर्यादा दिवस | पदनिर्देशित अधिकाऱ्याचे पदनाम | प्रथम अपिल अधिकाऱ्याचे पदनाम | व्दितीय अपिल अधिकाऱ्याचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | राज्य संरक्षित स्मारक परिसरात चित्रीकरण हेतू प्राप्त निवेदन / अर्ज / प्रस्ताव बाबत निर्णय घेण्याचा कालावधी निश्चित केरणे. | ६ दिवस | तंत्र सहायक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय (मुख्यालय व विभागीय कार्यालय) | सहाय्यक संचालक, (पुरातत्त्व) (विभागीय कार्यालय) | संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, मुंबई |

डॉ. तेजस म. गर्गे

संचालक

पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय

# Government of Maharashtra
# Directorate of Archaeology and Museums

St. George Fort, St. George Hospital Campus
Near C.S.M.T. Mumbai – 400 001
Tel. No. (022) 22623380/46 E-mail : mahaarchaeology@gmail.com

No. Tech. 2020 – 21/M. CRPS – Filming Notification/ 93 Date - 14 JAN 2021

## Department of Tourism and Cultural Affairs
## Directorate of Archaeology and Museums

St. George Fort, St. George Hospital Campus
Near C.S.M.T. Mumbai – 400 001

## Notification

**Maharashtra Right to Public Service Ordinance, 2015**

No. MISC. 2014/CR-216/Est. – In exercise of the powers conferred by Sub-Section (1) of Section 3 of the Maharashtra Right to Public Service Ordinance, 2015 (Mah. Ord. No. V of 2015), the Tourism and Cultural Affairs Department, hereby notifies the public services to be rendered to the eligible persons by the Directorate of Archaeology and Museums and it's subordinate offices, along with the stipulated time limit for providing such public services, the Designated officers, First Appellate Authorities and Second Appellate Authorities, as specified in the Schedule appended herewith, for the purpose of the said ordinance.

## Schedule

### 1. Directorate of Archaeology and Museums, Mumbai

| Sr. No. | Public Service | Time Limit for Providing Service days | Designated Officer | First Appellate Officer | Second Appellate Officer |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | Application/Request/ Proposals for shooting/Filming in the premises of State Protected Monuments | 6 Days | Technical Assistant, Directorate of Archaeology & Museums (Head Quarter & Divisional Office) | Assistant Director, (Archaeology) (Divisional Office) | Director, Directorate of Archaeology & Museums, Mumbai |

(Dr. Tejas M. Garge)
Director
Directorate of Archaeology and Museums